प्रमाणपत्र

दि: ०६/१२/२०२१

महोदय,

सदरील विषयावर लिहिण्यास आलेला निबंध मी स्वतः लिहिलेला असून त्यावरील आशय स्वहस्ताक्षर लिखित आहे. याची मी कु. समृद्धी बन्सी गायकवाड हमी देत आहे.

आपली नम्र,
कु. समृद्धी बन्सी गायकवाड
इ. ९ वी
वसुंधरा माध्यमिक विद्यालय,
आष्टी

अ

कु. समृद्धी बन्सी गायकवाड
9 वी 'अ'
वसुंधरा माध्यमिक विद्यालय, आष्टी
ता. आष्टी जि. बीड
संपर्क क्र. 9518500871 / 8237213233
ई-मेल – pravinbhavar775$29 @gmail.Com
पिन कोड - 414203

# भारतीय संविधानाचे महत्त्व

जहाँ डाल् डाल् पर्
सोने की चिड़िया करती है बसेरा
वो भारत् देश् है मेरा

जुलै १४९७ मध्ये भारतीय इतिहासात एक अविस्मरणीय घटना घडली. एक पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने भारत भूमीवर आपले पाय ठेवले. वास्को-द-गामा याने युरोपवरून भारताकडे येणारा सागरमार्ग शोधला. या मार्गाने अनेक पोर्तुगिज, डच, फ्रेंच, इंग्रज व्यापारी भारतात आले. भारतात विविध प्रकारचा व्यापार केला. या सुवर्णभूमीला पाहून त्यांचे डोळे चमकले. मोठ्या प्रमाणात त्यांनी भारताची लूट केली. बऱ्याच लोकांनी या भूमीवर राज्य करण्याचे स्वप्न पाहिले, पण हे स्वप्न स्वप्नच राहिले. मग ते व्यापार करून आपआपल्या प्रदेशात परतले. यानंतर इंग्रज व्यापारी भारतात आले. काही दिवस इथे व्यापार करून त्यांनी संपूर्ण भारत दर्शन केले. भारताला जवळून जाणून घेतले. त्यांनी भारतीय संस्कृतीचा अभ्यास केला व सोन्यासारख्या नटलेल्या या देशात गुलामगिरीचे बीज रोवण्याचा प्रयत्न सुरु केला. हळूहळू ते आपले राज्य प्रस्थापित करु लागले. त्यांनी जाणून घेतले की भारत हा अंधारात दडलेला आहे. गरिब-श्रीमंत, राजेशाही, विषमता जातिव्यवस्था, गुलामगिरी, स्त्री-पुरुष भेदभाव, विविध प्रकारच्या अंधश्रद्धेनी भारताला ग्रहण लावलेले आहे. त्याचा फायदा घेऊन अखंड भारतात आपले राज्य प्रस्थापित केले आणि खऱ्या अर्थाने इथून भारतीय इतिहासाला सुरुवात झाली. अनेक राजांनी इंग्रजांशी लढे पुकारले. काही राजे इंग्रजांत सामिल झाले. जवळ जवळ १५० वर्षे इंग्रजांनी भारतावर राज्य केले. भारतीय जनतेवर बरेच अन्याय केले. याविरुद्ध अनेक स्वातंत्र्यविरांनी अनेक बंड पुकारले. दिवसेन दिवस भारतीय जनतेवर इंग्रजांचा छळ वाढत होता आणि या छळा विरुद्ध भारतातील काही स्वातंत्र्यविरांनी १८५७ला पहिला उठाव केला आणि भारतीय संविधानाला सुरुवात झाली.

इंग्रजांनी १८५७ला त्याच्या विरुद्ध केलेल्या उठावात पकडलेल्या गुन्हेगारांना इंग्लंडच्या राणीसमोर उभा केले. आता प्रश्न उठला की यांना शिक्षा कशी द्यायची?...

भारत इतका अंधारात दडलेला होता, भारतीय राजांनी सुद्धा इंग्रजांसारखीच हुकुमशाही केली होती. राजा स्वतः गुन्हेगारांना शिक्षा देत असत, पण इंग्लंड हे लोकशाहीशासनपद्धतीचे

होते. गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी त्यांचे संविधान आणि काही कायदे होते. मग पकडलेल्या गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी काही कायदे बनवले होते. त्यांना 'IPC १८६०' असे म्हटले जाते.

पंडित जवाहरलाल नेहरु, नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, लोकमान्य टिळक यांसारख्या अनेक स्वातंत्र्य-विरांनी भारताला या गुलामगिरितून मुक्त करण्याचे ठरवले. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने भारताला या अंधारातून काढण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या अथक प्रयत्नातून भारताला स्वातंत्र्य मिळाले. 'चले जाव' या lचे आंदोलन झाले. यानंतर इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचे ठरवले. त्यावेळी भारत विविध प्रकारच्या अंधश्रद्धेत, अंधारात दडलेला होता. भारतात अनेक संस्थानिके होती. त्यावेळी इंग्रजांनी व भारतीय स्वातंत्र्यविरांनी भारताला अखंड बनविण्याचे ठरवले. यातून 'त्रिमंत्री कॅबिनेट मिशन' यांसारख्या योजना बनविण्यात गेल्या. सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानिकांना एकत्र करून अखंड भारताची पायभरणी केली. पाकिस्तानही स्वातंत्र्य झाले. राजेशाहीचे अस्तित्व संपले. मग आता राज्यकारभार करायचा कसा?...

या काळात बरेच देश लोकशाही शासन या पद्धतीचा वापर करत होते. या पेरणीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बऱ्याच देशांनी राज्यघटनेच्या अभ्यास करुन वेगवेगळ्या राज्यघटनेतील संल्कपणा एकत्रित करुन एक वेगळे संविधान तयार केले. यानंतर हे संविधान देशासमोर मांडले गेले. व यातलि चुका दुरूस्तीसाठी व काही फेरबदल करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात आल्या. जश्या की संविधान समीती व मसुदा समीती. आता हे कायमचे संविधान बनविण्यासाठी २ वर्षे ११महिने १८ दिवस लागले. संविधान लिहिण्याच्या सभेत २९९ सदस्य होते. व त्याचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपले याची बजावणी झाली.

संविधानामुळे अंधारात बुडलेला भारत प्रकाशमय झाला. भारतीय संविधानाने एक नवी क्रांती घडवून आणली. माणसाला माणूसपण मिळाले. भारत हे एक धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य बनले. संविधानामध्ये मानसाला स्वातंत्र्य, हक्क, कर्तव्य देण्यात आले. संविधानानुसार सर्वजण समान आहेत ही माणुसकीची भावना निर्माण झाली. संविधानामुळे भारतीय जिवनशैलीत मोठ्या प्रमाणावर

बदल झाला.

संविधानाने भारतीय जनतेला, सामाजिक जनतेला, आर्थिक व राजनैतिक न्याय मिळून देण्याचे काम केले. विचार, अभिव्यक्ती विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य मिळूवन दिले. दर्जाची व संधीची समानता आणि राष्ट्राची एकता एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्राप्त झाली. संविधानासमोर सर्वजण समान आहेत हे दिसून येते.

भारतीय संविधान इतर देशांच्या संविधानापेक्षा लांब लचक आहे व जगातिल सर्वात मोठी लिखित स्वरूपाची साधने आहेत. ज्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे संविधान बनविले; त्यावेळी बऱ्याच लोकांनी यावर टिका केल्या, पण डॉ. बाबासेहब आंबेडकरांनी जगाला दाखवून दिली जरी हे संविधान अनेक देशांच्या संविधानाच्या अभ्यासातून बनवले आहे, तरी हे एक उत्तम दर्जेचे संविधान आहे. आणि हे जगानी मान्य केले.

भारतीय माणसाच्या जिवनात संविधान हे सर्वश्रेष्ठ आहे. संविधानापेक्षा कोणीही वर नाही. सर्वजण समान आहे हे आपल्याला दिसून येते. काही वर्षापूर्वी एका आदिवासी (गरिब माण) गरीब मानवावर मोठ्या प्रमाणात अन्याय झाला. त्याला खोट्या चोरीच्या आरोपात अटक करण्यात आले. पोलिसांनी लाच घेऊन त्याचा छळ केला व पोलिस कस्टडी मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याच वेळी पोलिसांनी त्याच्या बायकोवर अत्याचार केले. पण त्याच्या बायकोने संविधानाच्या मदतीने न्यायालयात न्याय मागितला. तिच्या अथक प्रयत्नांतून तिला न्याय मिळाला. खऱ्या दोषींना शिक्षा मिळाली. तिला न्याय तर मिळालाचं आणि त्याच बरोबर सरकारकडून मदतही मिळाली. हे सर्व संविधानामुळेच होऊ शकले. यातून असे दिसून येते कि संविधानासमोर सर्वजण समान आहेत. संविधान, न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता नागरिकांना मिळून देण्यास कोठेही कमी पडत नाही. भारतीय संविधान हे प्रत्येक नागरिकांसाठी खूप महत्त्वाचे आहे.

भारतीय संविधान भारतीय जनतेच्या जिवनामध्ये एक अविभाज्य घटक आहे आणि जनतेने त्याचा दर्जा मिळवला आहे. आज भारतीय संविधानाचे महत्त्व प्रत्येकाला पटले आहे.

हर रंग ख़ुद में समेटे, जो बैखोफ लड़ा है,<br>
जाति और धर्म के दायरे से जो आगे बढ़ा है,<br>
नैतिक, निष्पक्ष, तर्कसंगत संविधान ही है वो,<br>
जो अपनी चिता पर भी आज सहज खड़ा है।